# जालना शहर महानगरपालिका,जालना

प्रशासकीय ईमारत,गांधी चौक ते रेल्वेस्टेशन रोड,

जुना जालना,जालना ४३१२०३

**जाहीर प्रगटन / निविदा सुचना**

जा.क्र.798 दिनांक 3 1/08/2026

जालना शहर महानगरपालिका जालना मा.सर्वसाधारण सभा दिनांक 06/04/2026 विषय क्र. (04) अन्वये जालना शहर महानगरपालिकाच्या वतीने सर्व महापुरूषांची जयंती/ पुण्यतिथी साजरी करणेकामी आवश्यक साहित्य पुरवठा करणे तसेच शासकीय उत्सवासाठी थोर पुरूषांचे पुतळयास मानवंदना देण्यासाठी /सजविणेसाठी आवश्यक साहित्य पुरवठा करणे कामी वार्षिक करार करणेसाठी मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्यानुसार सर्व इच्छुक असलेल्या अनुभवी एजन्सीधारकांकडून सर्व महापुरूषांची जयंती/ पुण्यतिथी साजरी करणेकामी आवश्यक साहित्य पुरवठा करणे तसेच शासकीय उत्सवासाठी थोर पुरूषांचे पुतळयास मानवंदना देण्यासाठी /सजविणेसाठी आवश्यक साहित्य पुरवठा करणेकामी वार्षिक करार करणेसाठी व्दिलिफाफा पध्दतीने निविदा /दरपत्रके माविण्यात येत आहे. ज्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1) निविदाधारकाने दाखल करत असलेल्या दरामध्ये साहीत्याबाबतचे बाबनिहाय ( Item wise Rates ) देणे अपेक्षित आहे.
2) संदर कामाची कोरी निविदा जाहिरात प्रदर्शित झाल्याच्या दि.02/09/2026 पासुन ते दि.09/09/2026 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागात रोख रक्कम रु.2000/- चा भरणा करून मिळेल.
3) सदर भरलेल्या निविदा सादर करण्याचा अंतिम दि.09/09/2026 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत राहील.
4) सदरील भरलेल्या निविदा मालमत्ता विभागात दुपारी 03.00 वाजेपर्यंत बंद लिफाफयात सादर करण्यात याव्यात.
5) सदर निविदा शक्यतो त्याच दिवशी अथवा मा.आयुक्त महोदय यांचे आदेशानुसार यथावकाश उघडण्यात येतील.
6) निविदे संदर्भातील सर्व अटी व शर्ती निविदेसोबत देण्यात आलेल्या आहेत.
7) सदरची निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे संपूर्ण आधिकार जालना शहर मनपा ने राखून ठेवले आहेत.
8) निविदेच्या कामाची अधिक माहिती तसेच अटी व शर्ती मालमत्ता विभागात उपलब्ध आहे.

**( त्र्यंबक कांबळे )**
**उपायुक्त**
**जालना शहर महानगरपालिका**
**जालना.**

**निविदा सादर करावयाची पध्दत**
**सर्व महापुरूषांची जयंती/ पुण्यतिथी साजरी करणेसाठी साहीत्य पुरवठा करणे बाबत.**

निविदा संच हा दोन भागात विभागलेला आहे.

**लिफ़ाफ़ा क्र.1**
या भागात निविदेची तांत्रिक माहिती :
निविदा अटीचे पुष्टीकरणार्थ आवश्यक कागदपत्रे इत्यादीचा समावेश आहे. यामध्ये खालील नमूद केलेली कागदपत्रे सादर करणे आनिवार्य राहील.

1. एजन्सीचे नोंदणी प्रमाणपत्र, पॅन / टॅन क्रमाक, GST प्रमाणपत्र.
2. अनामत रक्कम रू.10,000/- चा मा.आयुक्त जालना शहर महानगरपालिका जालना यांचे नांवे स्थानिक बँकेवर देय होणारा धनाकर्ष / डी.डी.स्वरूपात जमा करावा
3. निविदा प्रक्रियेत भाग घेणाऱ्या एजन्सीचा इतर भागीदार / संचालक इत्यादी यांचे शपथपत्र जोडणे आवश्यक राहील.
4. एजन्सीधारक याने या क्षेत्रात काम केल्याचा अनुभव / माहिती असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
5. इच्छुक एजन्सीधारकास उक्त क्षेत्राचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक राहील. त्यासाठी अनुभव प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक राहील.
6. इच्छुक एजन्सीधारक यांनी GST नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रती सादर करणे आवश्यक राहील.
7. मागील 3 वर्षाचे आयकर परतावा भरल्याची कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

**लिफाफा क्र.2**
या लिफाफ्यात निविदा दरपत्रक असावेत. दरपत्रकात सुवाच्च अक्षराने दर भरलेले असावेत.
**अटी व शर्ती:**

1. एजन्सीधारकाने साहीत्याबाबतचे बाबनिहाय दर पुरविणे बंधनकारक राहील.
2. इच्छुक एजन्सीधारक यांनी GST नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रती सादर करणे आवश्यक राहील.
3. निविदेतील दर्शविलेले काम 100% पूर्ण झाल्यानंतर व त्याबाबतचा अहवाल सादर केल्यानंतरच एजन्सीस देयक अदा करण्यात येईल.
4. शासन नियमाप्रमाणे देयकातून आयकर व इतर आवश्यक कपाती करण्यांत येतील.
5. निविदा स्विकारणे,अंशतः स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता निविदा पुर्णपणे नाकारण्याचा अधिकार हा मा.आयुक्त महोदय जालना शहर महानगरपालिका जालना यांनी राखुन ठेवला आहे.
6. एजन्सी धारक याने यापुर्वी सदरचे काम केल्याचा अनुभव / माहिती असल्याबाबतचे कागदपत्रे जोडणे बंधनकारक राहील.
7. इच्छक एजन्सीधारकास या क्षेत्राचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्यासाठी अनुभव प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्र सोबत जोडणे बंधनकारक राहील.

**टिप :- लिफाफे सादर करतांना, लिफाफा क्रमांक 1 व 2 असे स्पष्ट लिहुन, दोन्ही लिफाफे एका बंद पाकीटात सादर करण्यात यावीत.**

**( त्र्यंबक कांबळे )**
**उपायुक्त**
**जालना शहर महानगरपालिका**
**जालना.**